

# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २०३ वा ❑ रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## शिक्षक साहित्य संमेलनाध्यक्षपदी दासू वैद्य

### १४ डिसेंबरमध्ये अकोल्यात संमेलनाचे आयोजन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** राज्यव्यापी ११ व्या शिक्षक साहित्य संमेलनाध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख तथा ख्यातनाम कवी, गीतकार प्रा. डॉ. दासू वैद्य यांची निवड करण्यात आली आहे. शिक्षक साहित्य संमेलन संस्थेचा अध्यक्ष जयवंत पाटील यांनी यासंदर्भाने पत्र लिहून डॉ. वैद्य यांना कळवले.

शिक्षकांच्या साहित्य प्रज्ञेचा शोध घेण्यासाठी त्याचबरोबर भाषा आणि साहित्याचे अध्यापन आशय समृद्धीसाठी गतवर्षीप्रमाणे याही वर्षी अकोला येथे हे संमेलन घेण्यात येणार असल्याचे जयवंत पाटील यांनी पाठवलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. १४ डिसेंबर रोजी संमेलन होणार आहे. तत्पूर्वीचे दहा संमेलने ही मुंबई, ठाणे, बुलढाणा, रत्नागिरी, गोंदिया, विरार येथे पार पडली आहेत.



कवयित्री नीरजा, डॉ. सदानंद मोरे, नाटककार सफाअत खान, रमेश इंगळे, उत्रादकार, लोकशाहीर संभाजी भगत, प्रवीण बांदेकर, जयवंत पाटील, प्रा. वामन केंद्रे, प्रज्ञा दया पवार, राजन गवस यांनी यापूर्वीच्या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले आहे.

खासदार शरद पवार, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, हिंदूकार डॉ. भालचंद्र नेमाडे, ख्यातनाम विचारवंत प्रा. पुष्पा भावे, ज्येष्ठ रंगकर्मी सुलभा देशपांडे, नितीन वैद्य, वसंत आबाजी डहाके, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, रंगनाथ पठारे, जावेद अख्तर, निखिल वागळे, फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी यापूर्वीच्या संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली होती. शिक्षक साहित्य संमेलन संस्थेच्या विश्वस्त मंडळामध्ये मधु मंगेश कर्णिक, कपिल पाटील, उषा तांबे, संभाजी भगत, अरुण म्हात्रे, वामन केंद्रे, अशोक बेलसरे, सुभाष मोरे यांचा समावेश आहे.

---

## ‘आपले मंत्रालय’ मासिकाचा छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक प्रकाशित



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई –** माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते आज ‘आपले मंत्रालय’ मासिकाचा छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक प्रकाशित करण्यात आला. या प्रसंगी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल, उपसंचालक गोविंद अहंकारी, विशेष कार्य अधिकारी इर्शाद बागवान तसेच मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विशेषांकामध्ये शिवकालीन गडकिल्ले, शस्त्रे, पत्रव्यवहार, चलन, जलव्यवस्थापन अशा विविध विषयांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचे तेज, विचार आणि आदर्श आजही समाजाला प्रेरणा देतात. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, हेच या विशेषांकाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आपल्या मनोगतामध्ये नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले यांनी स्वतः रेखाटलेली छत्रपती शिवाजी महाराजांची पेंटिंग व मूर्ती मंत्री ॲड. शेलार यांना भेटस्वरूप दिली.

---

## मसापचा आज ८२ वा वर्धापनदिन, जालन्यात विविध कार्यक्रम

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** मराठवाडा साहित्य परिषदेचा ८२ वा वर्धापनदिन रविवारी, २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता जालना येथे आयोजित करण्यात आला आहे. जे.ई.एस. महाविद्यालयाचे सभागृहात आयोजित वर्धापनदिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी प्रा. इंद्रजीत भालेराव यांना निमंत्रित करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे राहतील. वर्धापनदिन समारंभात जालन्यातील ज्येष्ठ कथा-कादंबरीकार रेखा बैजल यांचा सत्कार करण्यात येणार असून प्राचार्य डॉ. रामलाल अग्रवाल आणि प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांची या समारंभाला विशेष उपस्थिती राहणार आहे. वर्धापनदिन समारंभानंतर जालना जिल्ह्यातील मान्यवर व नवोदित कवींचे कविसंमेलन आयोजित करण्यात येत आहे. या वर्धापनदिन समारंभाला व त्यानंतर होणाऱ्या कविसंमेलनाला रसिकांनी उपस्थित राहावे अशी विनंती मराठवाडा साहित्य परिषदेच्या जालना शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. कवीसंमेलन दुपारी २:०० ते ४:३० या दरम्यान होणार आहे.

राम गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संमेलनात कैलास भाले, रत्नमाला मोहिते, विठ्ठलराव काष्टे, ज्योती धर्माधिकारी, कल्याणी देशमुख, सत्यशीला तौर, सदाशिव कमळकर, शिवाजीराव कायंदे, प्रभाकर शेळके, बसवराज कोरे, रंगनाथ खेडेकर, श्रीकांत गायकवाड, कविता बोरगावकर, लक्ष्मीकांत दाभाडकर, रमाकांत कुलकर्णी, विद्या दिवटे, राजेंद्र देशमुख, दीपक राखुंडे, उद्धव अदुडे, सुचिता कुलकर्णी, अशोक पाठक, अजय देसाई, राजाराम जाधव, कृष्णा आर्दड, गणेश कंटुले, प्रदीप देशमुख, सुरेश कायटे हे सहभागी होणार आहेत.



## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - ५६

सागरी मोत्यांची निर्मिती ज्या नक्षत्रात होते त्या "स्वाती" नक्षत्राचा, नक्षत्र मालिकेत १५ वा क्रमांक आहे. 'तूळ' राशी असलेल्या कांही जातकाचे जन्मनक्षत्र 'स्वाती' असते. वायू तत्वाची रास असलेल्या 'तुळ' राशीच्या व्यक्तींवर 'स्वाती' नक्षत्राच्या आराध्य वृक्ष 'अर्जुन'चे प्रकृती गुण आढळतात. तूळ राशीस्वामी शुक्र असल्यामुळे या जातकांना सौंदर्याभिरुची सह विविध कला प्रकारांची आवड असते.

'पांढरा' आणि 'गुलाबी' रंग या राशीसाठी 'सकारात्मकता' निर्माण करतात.

'अर्जुन' हा वृक्ष अतिपावसाचा आणि कच्छचा प्रदेश वगळून भारतात सर्वत्र आढळतो. अर्जुनाचे लाकूड मजबूत आणि टिकाऊ असते. त्यामुळे घरबांधणी, शेतीची अवजारे, बैलगाडी अशा वस्तु बनवण्यासाठी हे लाकूड उपयोगात आणतात. अर्जुनाची साल ही हृदयाला बलशाली बनवते. ही साल उत्तेजक पण आहे म्हणून चहा मध्ये पण अर्जुन साली चा उपयोग करतात.

'स्वाती' नक्षत्राचा पर्यायी वृक्ष 'तुळस' आहे. 'तुळशीची' माहिती नसणारी व्यक्ती भारतात आढळणे कठीणच. 'भाव प्रकाश' या ग्रंथात तुळशीचं महत्व, तिचे प्रकार औषधी उपयोग आणि आजारांवर गुणकारी अशी माहिती दिली आहे. स्वाती नक्षत्राची देवता 'वायु' आहे. या नक्षत्राला १ तारका असते. या नक्षत्राची आकृती प्रवाळासारखी दिसते. 'वायु' ही एक वैदिक देवता आहे. 'वायु' ला अंतरिक्षाची देवता मानलेली आहे. वायु" हा सुंदर, मनोगती आणि सहस्र नेत्रांचा आहे.वायु च्या रथाला एक हजार अश्व ओढतात. या 'अश्व समुहा'ला, 'नियुत' असे नांव आहे. "ॐ वायवे नमः" हा मंत्र या नक्षत्र देवतेचा आहे.

'स्वाती' नक्षत्राची चारही चरणे 'तुळ' राशीत येतात. त्या त्या चरणांचे स्वामी, अनुक्रमे गुरु, शनि,शनि गुरु असे येतात.

वाचकहो, आपण जेव्हा ही माहिती अगदी थोडक्यात वाचतो आहोत. उद्देश एवढाच आहे की, जातकाची राशी आणि नक्षत्र या दोन घटकांमध्ये असलेल्या बारकाव्यांचाही तपशील, चित्राकार, रंग आणि प्रतिकांच्या आधारे त्या त्या "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये आपण अंतर्भुत करतो. देव-देवतांचे फोटो जसे आपण देवघरात ठेवतो. त्याच प्रमाणे 'वास्तुशास्त्र पेंटींग' आहे...!!!

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238

---



## देगलूर कॉलेजच्या १९७२ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** येथील रेल्वे स्टेशन जवळील हॉटेल स्कायटच मधे देगलूर कॉलेजच्या १९७२ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.वयाची सत्तरी ओलांडलेले सर्व मित्र मैत्रिणीं गेट टुगेदरला भेटल्या नंतर झालेला आनंद शब्दातून व्यक्त करणे अवघड होते. या गेट टुगेदरचा उद्देशच हा होता उर्वरित आयुष्यात आपणं मित्र मैत्रिणींनीं

आनंदात जगावं कसं यासाठी एक दिशा देणारं हे गेटटूगेदर होतं.आपला परिचय करुन देताना प्रत्येक मित्र..मैत्रिणींनी आपल्या क्षेत्रातील यशोगाथा सुंदर शब्दांतून व्यक्त केली. काही मित्रांची समाजासाठी समर्पित जीवनाची यशोगाथा साऱ्यांनाच उत्साहीत करणारी नी नवी प्रेरणा देणारी ठरली.त्यांची यशोगाथा ऐकताना बऱ्याच जणांचे डोळे पाणावले.यशोगाथा सांगताना कुठेही अहंभाव नव्हतां तर विनम्रताच होती.

देगलूर कॉलेजच्या १९७२ बॅचच्या विद्यार्थ्यांच्यां स्नेहमेळाव्यात गुरुजनानांही निमंत्रीत करुन त्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.आशीर्वादपर भाषणातून गुरुवर्यांनी सांगितले उर्वरित आयुष्यात कला गुण छंद जोपासा सकारात्मक कार्य करा. त्यामधूनच आपलं जीवन आनंदमय सुखमय होवून जाईल.

डॉ.सूर्यकांत शिरपेवार यांचे मंत्रमुग्ध करणारे सुत्रसंचलन साऱ्यांच्या चिरकाल स्मरणात राहील इतकं सुरेख होतं.

स्नेह मेळाव्यास सहभागी झालेले विद्यार्थी – डॉ.सूर्यकांत दिगंबरराव शिरपेवार, डॉ.सुरेंद्र गोविंदराव आलूरकर, डॉ.चंद्रशेखर देविदासराव बासरकर, डॉ.अशोक बालय्या चुंडूरवार, डॉ. व्यंकट तुकाराम मलशेटवार, डॉ.खुशाल ईरवंतराव विभूते, श्री मधुकर गोविंदराव नारलावार, श्री प्रल्हाद बापुराव सालडेवार, श्री ग्यानोबा हुल्लाजी पाळेकर

श्री पुंडलिक गणपतराव ठाकूर, श्री माणिक (सतीश) विठ्ठलराव येवतीकर, श्री शेषराव मारुतीराव कुलकर्णी, श्री शेख मुजीब शेख हमीद.

आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित प्राध्यापक मंडळी – श्री प्रा.नारायण आर कुलकर्णी (सपत्नी), श्री प्रा.व्यंकटेश जी.जोशी(सपत्नी), श्री प्रा.पुरुषोत्तम डी.देशमुख(सपत्नी), श्री प्रा. गीताराम एम. कुलकर्णी.

---

### विशेष लेख...

## भारतात कर्करोग का वाढत आहे?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कर्करोग हा संपूर्ण जगातील सर्वात प्राणघातक आजार आहे आणि त्यामुळे दरवर्षी लाखो लोक आपला जीव गमावतात. कर्करोगाचे अनेक प्रकार आहेत आणि काही कर्करोग टाळता येतात.

भारतात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढत आहे आणि ती वेगाने वाढत आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च-नॅशनल कॅन्सर रजिस्ट्री प्रोग्रामने असा अंदाज वर्तवला आहे की देशात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या २०२२ मध्ये १४.६ लाखांवरून २०२५ मध्ये १५.७ लाखांपर्यंत वाढेल. आयसीएमआरचा अंदाज आहे की भारतातील अंदाजे नऊ जणांपैकी एका व्यक्तीला त्यांच्या आयुष्यात कर्करोगाचे निदान होण्याची अपेक्षा आहे.देशात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या सतत वाढत आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, २०२४ मध्ये भारतात कर्करोगाच्या रुग्णांची अंदाजे संख्या १५.३३ लाखांपेक्षा जास्त आहे. कर्करोगाच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. २०१९ मध्ये कर्करोगाचे १३.५ लाख रुग्ण आढळले, तर २०२० मध्ये १३.९ लाख रुग्ण आढळले. २०२३ बद्दल बोलायचे झाले तर, त्या वर्षी कर्करोगाने ८.२ लाख रुग्णांचा मृत्यू होण्याचा अंदाज आहे. कर्करोग हा संपूर्ण जगातील सर्वात प्राणघातक आजार आहे आणि त्यामुळे दरवर्षी लाखो लोक आपला जीव गमावतात. कर्करोगाचे अनेक प्रकार आहेत आणि काही कर्करोग टाळता येतात.

भारतात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये वेगाने होणारी वाढ सामाजिक, पर्यावरणीय आणि जीवनशैलीच्या घटकांमुळे आहे. चुकीची जीवनशैली, अस्वस्थ खाण्याच्या सवयी, फास्ट फूडचे वाढते सेवन, शारीरिक हालचालींचा अभाव आणि लठ्ठपणा हे या प्राणघातक आजाराच्या वाढत्या घटनांमध्ये योगदान देत आहेत. धूम्रपान, तंबाखू आणि जास्त प्रमाणात मद्यपान हे फुफ्फुसांचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग (तोंडाचा कर्करोग), यकृताचा कर्करोग आणि पोटाचा कर्करोग होण्याची प्रमुख कारणे आहेत. जास्त वायू प्रदूषण, पाण्यात हानिकारक रसायने आणि खतांनी प्रक्रिया केलेल्या भाज्या आणि फळांचे सेवन यामुळे शरीरात विषारी पदार्थांचे प्रमाण वाढते, ज्यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो. शिवाय, अनेक अनुवांशिक घटक देखील कर्करोगासाठी जबाबदार असू शकतात.

कर्करोगाच्या वाढीमध्ये पर्यावरणीय प्रदूषण देखील भूमिका बजावते, विशेषतः वायू प्रदूषण.काही संसर्गांमुळे कर्करोग देखील होऊ शकतो, जो भारतात एक महत्त्वाचा घटक आहे. प्रभावी तपासणी कार्यक्रम आणि जागरूकता नसल्यामुळे कर्करोगाचे निदान अनेकदा उशिरा होते, ज्यामुळे उपचार कठीण होतात आणि मृत्युदर वाढतो.

ही स्थिती गुंतागुंतीची आहे आणि ती अनेक सामाजिक, पर्यावरणीय आणि जीवनशैली घटकांचे संयोजन आहे. कर्करोगाचा वाढता भार कमी करण्यासाठी जागरूकता वाढवणे, निरोगी जीवनशैलीतील बदलांना प्रोत्साहन देणे आणि कर्करोगाच्या काळजीची उपलब्धता सुधारणे आवश्यक आहे.

काय करता येईल?

निरोगी जीवनशैली: पुरुष आणि महिला दोघेही निरोगी जीवनशैली राखून कर्करोगाचा धोका कमी करू शकतात. संतुलित आहार घ्या, नियमित व्यायाम करा आणि तंबाखू आणि जास्त मद्यपान टाळा.

नियमित तपासणी: नियमित कर्करोग तपासणीमुळे कर्करोग लवकर ओळखण्यास मदत होते. महिलांनी नियमित मॅमोग्राम आणि पॅप स्मीअर्स करावेत. पुरुषांनी प्रोस्टेट कर्करोग तपासणीचा विचार करावा.

अनुवांशिक चाचणी: अनुवांशिक चाचणीमुळे विशिष्ट प्रकारच्या कर्करोगाचा धोका असलेल्या व्यक्ती ओळखण्यास मदत होऊ शकते. ही माहिती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा अधिक वारंवार तपासणी करण्यासाठी वापरली जाऊ शकते.




## जात्यावरच्या ओव्या......

शिवाराच्या वाटा
गावदेवाचे देऊळ
शुक्रवार दिनी
तुला फोडते नारळ ||२७७||

शिवाराची वाट
झोळी पाठीला बांधते
बाळ राघुशी मह्या
गप्पा करत चालते ||२७८||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## मी कल्हईवाला बनतो...




ज्योतिर्मय साहित्य

तुम्हाला कसा आणि कुठे भेटला ?

अहो, तो दारावर आला होता. त्याच्याकडून माझ्या भांड्यांना कल्हई करून घेतली.

ठीक आहे. तो भेटला तर त्याचा नंबर घ्या. आम्हाला या नंबरवर कळवा. आम्हाला महत्वाचे काम आहे.

असे म्हणून हवालदार साहेबांनी फोन ठेवला. मी मात्र हवालदिल झालो. या महाशयांचे काय काम असावे कल्हईवाल्याकडे ? पोलीस स्टेशनमध्ये कधी तांब्यापितळेची भांडी पाहिल्याचे मला आठवत नाही. म्हटलं जाऊ द्या. आपल्याला काय करायचे ! नाहीतरी अलीकडे सगळ्याच गोष्टींना कल्हई करायची गरज आहे ! अशा प्रामाणिक विचारात रस्ता पार केला. पेपरवाल्याकडे आलो. त्याला म्हटलं, बाबा, अमुक अमुक पेपर आहे का?



आहे ना साहेब.

त्याला पुरवणी आहे का ? ( कधी कधी एखाद्या पेपरमध्ये त्यांचे पुरवणीचे पान टाकायचे राहून जाते )

आहे ना साहेब. त्याने पाहून खात्री केली. मी पैसे दिले, पेपर घेऊन मार्गाला लागलो. रस्त्यात पेपर उलगडून पाहिला. त्यात कल्हईवाल्याच्या छायाचित्रासह माझा लेख आला होता. संपादक महाशयांनी लेखाच्या वर माझे नाव, फोटो छापला होता. लेखाच्या मध्यभागी कल्हईवाला असे ठळक शीर्षक होते. आणि लेखाच्या खाली संपर्कासाठी क्रमांक म्हणून माझा फोन नंबर दिला होता. आता लोकांचा काय गोंधळ झाला असावा याचा उलगडा मला झाला. लेखाच्या खाली दिलेला नंबर कल्हईवाल्याचा समजून त्यांनी मला फोन केला होता.

त्या दिवशी मला असे मोजून सातआठ फोन आले. एकाने तर चक्क विचारले की माझ्याकडे तांब्यापितळेची जुनी भांडी आहेत. ती वितळवून तुम्ही त्याच्या देवांच्या मूर्ती घडवून द्याल का ? त्या दिवशी मला अशा खूप नवनवीन गोष्टी कळल्या. नवीन उलगडा झाला. आपल्या लेखातून मनाला थोडीफार कल्हई करण्याचा आपण प्रयत्न करतो पण ते काही बरोबर नाही. आपल्याला आता प्रत्यक्ष कल्हईवाला होण्याची आवश्यकता आहे असेही वाटून गेले. ज्याची लोकांना गरज आहे असा एक नवीन व्यवसाय गवसला. आता कल्हई शिकून घेण्यासाठी तरी त्या कल्हईवाल्याला भेटणे आवश्यक झाले. तो पुन्हा कधी भेटतो बघू या. यावेळी मात्र मी त्याचा नंबर घ्यायला विसरणार नाही. त्या पोलीस स्टेशनला पण कळवावा लागेल ना !

माझ्या मनात डफलीवाले डफली बजा च्या चालीवर उगाचच एक गाणे आकार घेऊ लागले.

कल्हईवाले, इधर तो आ
सारी दुनिया बुलाती हैं
तेरी कल्हईसे मेरे बर्तनपर क्या रंग आने लगा हैं
चांदी के जैसा बर्तन ये मेरा मुझको लगने लगा हैं
इधर भी आओ, उधर भी जाओ
बुला रहे हैं दुनियावाले...
कल्हईवाले, इधर तो आ..






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मुमुक्षलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

मी दुराभिमानी आहे, रागीट वर्तनाचा, व्यसनाधीन आहे. मी आळशी, अंगचोर, कपटी भित्रा, मूर्ख आणि अविचारी आहे. मी नालायक, बडबड्या, पाखंडी, तोंड टाकून बोलणारा, वाकड्या बुद्धीचा, वाईट विचारांचा आहे. मला कोणतेचं ज्ञान नाही मी सगळ्यात कमी आहे. ‘‘अशा पद्धतीने जो स्वतः ची वाईट लक्षणें वर्णन करतो तो मुमुक्षु होय. अत्यंत स्वार्थी,अनर्थ निर्माण करणारा परमार्थाचा तर लवलेशही नसलेला. असा अवगुणांची खाण असलेला मी व्यर्थ जन्माला आलो मी म्हणजे खायला कहार आणि धरणीला भार असा आहे.

अशा रीतीने जो स्वतः ची निंदा करतो, स्वतःचे असलेले दोष मान्य करतो. ज्याला मनांतून संसाराचा त्रास वाटतो. संसार नकोसा वाटतो, ज्याला सत्संगाची ऊत्कट इच्छा उत्पन्न होतेतो मुमुक्षु होय. पुष्कळ तिर्थे फिरून पाहिली,समाधीसाधने अभ्यासली अनेक ग्रंथाचे अभ्यास पूर्ण पारायणे केली तरी मनाला समाधान झाले नाही. हे सगळे बुद्धीचे अनुमान आहे, कल्पनेचा खेळ आहे असे समजले, हे लक्षात घेऊन संतांना शरण जाण्यास तयार होतो तो मुमुक्षु असतो.


सहा शमदमादि साधने.

१) शम शांतपणा २) दम इंद्रिय दमन ३) तितिक्षा सुखदुःख पचवणे. ४) उपरति अनासक्ति ५) श्रद्धा किंवा शास्त्र सद्गुरूच्या वचनी विश्वास

६) सत्यबुद्धि आणि समाधान किंवा एकविध करण्याची कला देह, कुळ, द्रव्यदारा आणि इतर गोष्टींचा अभिमान बाजूला सारून जो संतांच्या चरणीं अनन्य भावाने लीन होतो तो मुमुक्षु असतो.

(क्रमशः)

## संतांचा सहवास । याहून भाग्य नाही दुसरे खास ॥



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

ह्या प्रपंच प्रारब्ध उपाधि । त्यांसी त्रासू नये कधी । हीच जाणावी उघड समाधि ।। सावली मातीत पडली । तिला धुऊन नाही घेतली । तसेच खरे आहे देहाचे । पण ते संतांनाच साधे ।। सर्व संकल्प वर्ज्य करून । अवस्था असावी बालकवृत्तिसमान ।। सतत विवेक अखंड चित्ती । रामनामी मनोवृत्ति । हेचि तुम्हा परमप्राप्ति ।। मारुनी खोटी कल्पनावृत्ति । रामनाम अखंड चित्ती । समाधान संतोष शांति ।। देवासी सर्व करी अर्पण । करी स्वानंदयुक्त परमात्मचिंतन । हीच सिद्ध साधूची खूण ।। वासना जाळून शुद्ध चित्त । अहंभाव सोडून होई निभ्रांत ।। आता मी रामाचा, राम माझा । हे जाणावे पूर्ण ।।

संतसहवास त्याला पाही । जो देहबुद्धि टाकून राही ।। संतास न पाहावे देहात । आपण देहापरते होऊन पाहावे त्यास ।। नामात ठेवा प्रेम । हीच संतांची खूण ।। जे जे आपले संगती आले। संताने त्यांचे सार्थकच केले ।। साधूने देह ठेवला । तरी सत्तेने जागृत राहिला ।। त्याची ठेवावी आठवण । सेवा करावी रात्रंदिन ।। संतांचा सहवास । याहून भाग्य नाही दुसरे खास ।। संतचरणी विश्वास । त्याने भगवंत जोडला खास ।। लक्ष ठेवावे संताकडे । देह लावावा प्रपंचाकडे।। नाम घ्यावे श्वासोच्छ्वास । संत संतुष्ट होईल खास ।। सांगावे संतास नमस्कार । जो जगताचा आधार । संताच्या देहाची प्रारब्धगति संपली । काया आज दिसेनाशी झाली। परि अजरामर राहिली ।। राम कर्ता हे जाणून चित्तीं । जगात संत ऐसे वर्तती । जेणे दुसऱ्यास मार्गदर्शक होती।। संतांचे करावे अनुकरण । घ्यावे त्यांचे दर्शन । सांगावे आलो आहे आपण । विचाराव्या कठिण वाटा। जेणे सुलभ होईल व्यवहारी चालता ।। रामापरता नाही लाभ । हे धरले ज्याने चित्ती । त्यास लाभली खरी संतांची संगति ।। त्यांचा आदर्श ठेवावा पुढे । कधी न होईल वाकडे ।। स्वत:चे पावावे समाधान । त्याने लोकांस आणण्याचा प्रयत्न करावा जाण ।। संताशी व्हावे अनन्य शरण । दुसरीकडे जाण्याचे नाही कारण ।। भाग्याने संत घरी आला । अभागी न मानी त्याला ।। सूर्याचा प्रकाश झाला । आंधळ्याला उपयोगी नाही आला । तैसी विषयी झाली ज्याची वृत्ति । संताची संगत त्याला न लाभती ।। रामनामावाचून ज्याचा वेळ जात नाही । तोच जीवन्मुक्त पाही ।। देहाचे ठिकाणी विरक्त । विषयाचे ठिकाणी नसे अहंममत्व । त्यालाच म्हणतात मुक्त ।।

रामापरते न मानावे हित। हे सर्व संतांचे मनोगत ।।

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

ज्योतिर्मय साहित्य

असे सदबुद्धी असलेले सिद्ध पुरुष अनेको अनेक निर्माण व्हावेत. त्यांच्या प्रभावातून दृष्टांचा दुष्टपणा कमी व्हावा सर्व भूतमात्रात परस्परात स्नेह निर्माण व्हावा. ही मंगल कामना आणि तशी आग्रही मागणी भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी आपली अनंत जन्माची तपसाधनेचे तेज पणाला लावून हे पसायदान मागून घेतलेले आहे. असे सुबुद्धी असलेले म्हणजेच बुद्धी योगी सिद्धपुरुष निर्माण होण्यासाठी त्यांना सिद्ध करून घेणारे, समर्थ सद्गुरु तितक्याच मोठ्या प्रमाणावर लागणार आहेत, म्हणून भगवंताला त्यांनी अशा सिद्ध पुरुषांचे जथेच्या जथे लोककल्याणासाठी आणि बुद्धी योगी सिद्ध पुरुष घडविण्यासाठी जनसामान्यात पाठवावेत ही आग्रहाची विनंती केली आहे. आणि तसा आदेश या महारावानी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराजांनी इतर सिद्धांना दिला आहे. असे सिद्ध पुरुष निर्माण झाल्यानंतर त्यांच्या प्रभावाने राग द्वेष मोह अभिनिवेष हे क्लेश क्षिण होतील. आणि समाज सत्वगुण प्रधान व्हायला मदत होईल. म्हणजेच पर्यायाने या समाजाचे अध:पतनापासून रक्षण होईल.

आता आपणास कळाले असेल की ज्ञानेश्वर महाराज यांनी ही ज्ञानेश्वरी या जगताचे अध्यपतनापासून कसे रक्षण करील याचा वस्तू पाठ या ग्रंथातून दिला आहे.यात अनेक दिव्य प्रयोग दिले आहेत. साधकांनी ते प्रयोग स्वतःची पात्रता वाढवून आणि श्री गुरुच्या कृपेने मिळवायचे असतात. आणि पूर्णत्वास न्यायचे असतात.

अशा रीतीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निश्चितच या कलि युगाला अध:पतनापासून वाचविणारा महान ठेवा आहे. यात किंचितही शंका नाही.

सिद्ध पुरुषांचे सामर्थ्य कसे असते हे जाणण्यासाठी नुकतेच आळंदी येथे केलेला एक प्रयोग लक्षात घेण्यासारखा आहे.

काही लोकांना असे अनुभवास आले की ज्ञानेश्वर माऊलीची समाधी असणाऱ्या आळंदीच्या परिसरात कितीही लोक येवोत त्यांच्यात सद्भाव, भक्ती जागृत होते. विकारांना थोडासा लगाम लागतो. हे याच क्षेत्रात आल्यावर कसे काय घडते ?हा प्रश्न पडला. काही लोकांनी वैज्ञानिक प्रयोग करून पहावे म्हणून अल्फा रेज चा संदेश टिपणारे उपकरण आणले आणि त्यांच्या हे लक्षात आले की, माऊली च्या समाधी स्थानापासून दहा किलोमीटर वर हवेत आणि २२ किलोमीटर रुंद परिसरात सर्वत्र अल्फा रे चा प्रभाव दिसून आला.

समाधी अवस्थेत जेव्हा योगी असतो ,तेव्हा ही दिव्य किरणे त्याच्या मस्तकातून बाहेर प्रस्फुटीत होत असतात,

आणि त्यांच्या संपर्कात जो कोणी येईल, त्याचा रजो गुण आणि तमोगुण कमी होऊन, सत्वगुण प्रभावशाली होऊ लागतो.

माऊली समाधीस्थ होऊन आज साडेसातशे वर्षे झाली. आजही इतक्या प्रचंड प्रमाणात अल्फा रे चा वर्षाव समाधी स्थानातून बाहेर पडतो आहे. तर ज्यावेळेस माऊली प्रत्यक्ष देहानीशी हजर होते, त्यावेळेस त्यांचा प्रभाव किती दूरपर्यंत जात असेल?ज्ञानेश्वरीत दिलेले दिव्य प्रयोग हे गुरूच्या मुखातून त्यांच्या आज्ञेने प्रत्येकाने कसोशीने करावेत व स्वतः विकसित होण्या सोबतच अवती भवतीचा संपूर्ण परिसर सत्व गुण प्रधान करून या देशाला सुजलाम सुफलाम करण्याकडे वळावे ही इच्छा व्यक्त करून हा भाग इथेच संपवितो.

****

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

एकवीरे त्वमेकैव मदाश्रयाय पालिके।
सूर्यप्रभासमे देवि विघ्नं ज्वालय मेऽधुना।।८८।।

एकवीरे, तू एकटीच माझे आश्रयस्थान, पालनस्थान आहेस. सूर्यासम कान्ती असणाऱ्या हे देवी, आता माझे विघ्न जाळून टाक.

त्वमेव केवलं देवि कालिके जगदम्बिके।
संरक्षणार्थं समर्थाऽसि त्वमाशा प्रथमा च मे।।८९।।

हे देवी, कालिके, जगदंबे, केवळ तूच संरक्षणासाठी समर्थ आहेस. तूच माझी प्रथम आशा आहेस.

प्रथमा चान्तिमा त्वं च त्वमेवाशा हिते रता।
अहं पूर्णतयाऽयामि शरणं जगदम्बिके।।९०।।

आद्य आणि अंतिम ही आशा तूच आहेस. तूच माझे हित करण्यात रत आहेस. हे जगदंबिके, मी तुला पूर्णपणे शरण येत आहे.

अनुकम्पास्वरूपिण्यै नमो नमो नमो नमः।
इच्छाशक्तिस्वरूपिण्यै नमो नमो नमो नमः।।९१।।

हे अनुकंपा स्वरूपिणी, तुला वारंवार नमस्कार असो. हे इच्छाशक्तीस्वरूपिणी, तुला वारंवार नमस्कार असो.



## आरोग्य संजीवनी

### रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण...

ज्योतिर्मय साहित्य

१) जेवणाच्या लगेच आधी, जेवतांना मध्ये-मध्ये आणि जेवणानंतर लगेच पाणी प्यायचे नाही. कारण त्यामुळे जठराग्नी विझते, पाचक रस पातळ होतात त्यामुळे खाल्लेले अन्न पचत नाही. त्यामुळे जेवणाच्या किमान आर्धा तास आधी आणि जेवणानंतर एका तासानेच पाणी प्यावे.

२) पुरेसे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पाणी प्यावे - पुरेसे म्हणजे २० किलो वजनाला १ लिटर पाणी लागते म्हणजेच ६० किलो वजन असेल तर ३ लिटर पाणी आवश्यक आहे, अती नको वा कमीही नको. शिस्तबद्ध पद्धतीने म्हणजे पाणी नेहमी बसून प्यावं, उभं राहून पिऊ नये. पाणी नेहमी ग्लास तोंडाला लावून प्यावं, वरुन पिऊ नये. आणि महत्वाचं म्हणजे पाणी चावून खावे म्हणजे गटागट न पिता जास्तीत जास्त लाळ मिसळून सावकाश पिलं पाहिजे कारण लाळ अल्कलाईन (क्षारीय) असते, ती दर मिनिटाला साधारण ०.५ बनत असते, ती जास्तीत जास्त पाण्यासोबत पोटात जाणे गरजेचे असते. कारण त्यामुळे पोटातील ॲसिडीक वातावरण नॉर्मल (सामान्य) व्हायला मदत होते आणि पोटातील ॲसिडीक वातावरण जेवढं नॉर्मल (सामान्य) होईल तेवढं वात-पित्त-कफ संतुलित राहून आपण निरोगी राहतो.

पाणी पुरेसे आणि शिस्तबद्ध पिण्यात आलं तरच किडनी ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते.

३) जागरण टाळणे - रात्री १० च्या आत झोपलंच पाहिजे. कारण रात्री १० च्या आत झोपलं तरच आपण रात्री ११ ते ३ या वेळेत गाढ झोपेत असू आणि या वेळेत गाढ झोपेत असलो तरच यकृत () ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते, अन्यथा शरीरशुद्धी व्यवस्थित होत नाही.

४) सुर्यास्तानंतर शक्य तितके लवकर जेवावे - सुर्यास्तानंतर आपली जठराग्नी शांत व्हायला लागते. त्यामुळे सुर्यास्तानंतर शक्य तितक्या लवकर जेवावे. खरं तर सुर्यास्तानंतर काहीच खाल्लं नाही पाहिजे. पण आपल्या लोकांचा स्वयंपाक लवकर होत नसल्याने सुर्यास्तानंतर किमान शक्य तितक्या लवकर तरी जेवावे.

५) रात्री जेवलं की लगेच झोपणं टाळावे - जेवलं की लगेच झोपलं तर खाल्लेले पचत नाही आणि न पचलेलं सडून विषारी द्रव्ये (टोक्सिन्स) तयार होतात. त्यामुळे रात्रीचं जेवण आणि झोपणं यामध्ये २-३ तासांचे अंतर अवश्य असावे.

६) ताण-तणाव (स्ट्रेस) टाळावा - ताण-तणावांमुळे शरीरात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात. त्यामुळे ताण-तणाव नियंत्रित राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम व ध्यान (मेडिटेशन) करावे.

७) विरुद्ध आहार टाळावा - विरुद्ध आहार शक्यतो दूध-दही याबाबतीत घडतो. जेवतांना दूधाची खिर खाऊ नये किंवा जेवणानंतर लगेच दूध पिऊ नये. कारण दूधात मीठ टाकलं तर दूध नासते, मग जेवणात मीठ असतेच त्यामुळे जेवतांना किंवा जेवणानंतर लगेच दूध पिलं तर दूध नासण्याची प्रक्रिया पोटात चालू होते आणि त्यामुळे पोटात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात म्हणून याला विरुद्ध आहार म्हणतात.

तसेच दही रात्री खाणंही विरुद्ध आहार आहे कारण दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) आपल्या शरीरात दुपारीच बनत असतात त्यामुळे दही दुपारीच खावे. रात्री दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) बनत नसल्यामुळे रात्री दही पचत नाही उलट सडून विषारी द्रव्ये तयार होतात त्यामुळे याला विरुद्ध आहार मानलं जातं.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

तिला मनात असलेले रामाचे स्वरूप संबंधी विचारायचे होते व तिला रावणाचा प्रश्न विचारायचा होता.ती म्हणे तुझा राम आत्मा आहे की एकदेशी आहे(म्हणजे देव नसून माणूस आहे).तिने सीतेला अजून गोंधळात टाकायचे ठरविले. ती म्हणते.तू रामाला एक देशी म्हणत असशील तर तो जीव आहे तो आज ना उद्या मरणाचं आहे.मग तुला रावणाशी लग्न करण्याने असे काय बिघडणार?

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

आणि तो जर व्यापक आहे ,तर तो रावणात ही आहे.मग तुला त्याच्याशी लग्न न करायला काय अडचण आहे ?

यावर सिता हसली. त्या म्हणाल्या .माझा राम एकदेशी नाही आत्माराम आहे.

मग रावणातही तोच आहे यावर सिता म्हणते १ ती म्हणे रावणातही तोच (राम)आहे तर मी पुनः लग्न त्याचेशी का करावे? २ माझा राम मुंगी पासून ब्रम्ह देवापर्यंत तोच राम असेल तर, एक सांग माझ्यातही राम व रावणातही तोच राम, मग एका रामाचे दुसऱ्या रामाशी लग्न कसे होईल?

३ रावणात जर राम आहे तर रावण कोठे आहे? हे सिद्ध कर मग मी त्याच्याशी लग्न करते.

मंदोदरीला हा तर्क पटला.तिचे समाधान झाले.तिला रामाच्या स्वरूपाचे जे जाण्याचे होते ते तिने जाणले व ती परत गेली. युद्ध सुरू झाले.रोज नवे सैन्य आणावे.ते रामाने मारावे. वानरही कांहीं मेले.

(क्रमशः)

# कोर्टाची पायरी...

**ज्योतिर्मय साहित्य**

तसे थोडे मोठे झालो की बऱ्याच गोष्टी पटायला लागतात. त्या मधील एक म्हणजे शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये वगैरे वगैरे पण एक दिवस कोर्टाची पायरी चढावी लागली कारण माझे काही खास मित्र वकील झाले होते. तसे ते कधी कोर्टात बोलवत नसायचे, पण एक मित्र जो बरेच दिवस भेटला नव्हता, लहान भाऊ सी. ए. असल्यामुळे त्याला तो कोल्हापूर येथे नेहमी भेटत असे टॅक्स संदर्भात. त्यामुळे त्याने येरे कोर्टात, ''खूप दिवस झाले भेटलो नाही'' म्हणून बोलावलं

पुण्याच्या गर्दीच्या न्यायालयीन इमारतीत त्या दुपारी नेहमीसारखीच लगबग होती. लहानमोठ्या प्रकरणांच्या रांगा, वकिलांच्या काळ्या कोटांची वर्दळ, आणि कागदांच्या गठ्ठ्यांत अडकलेले लिपिक. पण माझ्या वकील मित्रांची वेगळीच उत्सुकता होती कारण उद्योगपती जयेश व्होरा यांचा जामिनावर निर्णय होणार होता.

केस होती बनावट इनव्हॉइस आणि तब्बल अठ्याहत्तर कोटींचा कथित घोटाळा! यावर आज निकाल द्यायचा होता. न्यायालयात माझा मित्र, पक्षाचे वकील उभे राहिले. ''माननीय न्यायाधीश, या प्रकरणात माझ्या क्लायंटचा थेट सहभाग दाखवणारा ठोस पुरावा नाही. केवळ सहआरोपींच्या कबुलीजबाबांवर कोणी दोषी ठरत नाही. शिवाय अटके दरम्यान आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यावरूनच ही कारवाई बेकायदेशीर ठरते.''

एकामागोमाग एक मुद्दे ते मांडत राहिले, अटक मेमोवर कुटुंबीयांची स्वाक्षरी नसणे, पुणे न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मर्यादित असणे, आणि आर्थिक गुन्ह्यात जामिनाला प्राधान्य द्यावे, हे न्यायालयीन तत्त्व.



सभागृहात कुजबुज सुरू झाली. सरकारी वकिलांनी जोरदार हरकती घेतल्या तरीही न्यायाधीशांनी कागदपत्रांवर पुन्हा नजर फिरवली. काही क्षण वातावरण तंग झालं.

आणि मग शांत स्वरात न्यायाधीशांनी निर्णय दिला

''जयेश व्होरा यांना जामीन मंजूर.''

त्या एका वाक्याने सभागृहात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या. बचाव पक्षाने दिलासा घेतला, कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर हायसं वाटल्याचे भाव उमटले.

या विजयामागे होती एक रणनीतिक टीम ॲडव्होकेट राजेंद्र केडगे, ॲडव्होकेट सुनील यादव, ॲडव्होकेट संतोष काळोखे, ॲडव्होकेट उमंग यादव, ॲडव्होकेट कुमार आणि ॲडव्होकेट प्रज्वल पवार. त्यांच्या युक्तिवादाने अखेर उद्योगपतीला तुरुंगाच्या भिंतीबाहेर यायची संधी मिळवून दिली.



सतीश इंदापूरकर
पुणे

हा असा कोर्टामधील अनुभव पहिल्यांदा घेतल्यामुळे खूप वेगळ्या विश्वात असल्यासारखं वाटत होतं. कायद्याची भाषा, पुराव्यांची नाजूक मांडणी, प्रत्येक शब्दाचं वजन,हे सगळं डोळ्यासमोर घडत होतं.

माझ्या वकील मित्रांनी कायद्यानुसार क्लायंटची मुक्तता मिळवली, ती त्यांची व्यावसायिक जिद्द होती. पण माझ्यासाठी हा अनुभव वेगळाच धडा देऊन गेला!

न्यायालय म्हणजे केवळ आरोप-प्रत्यारोपांचं व्यासपीठ नाही, तर तिथे शब्द, पुरावे आणि प्रक्रिया यांचा काटेकोर संगम घडतो. इथे भावनांना फारसा वाव नसतो, पण न्याय शोधणाऱ्या माणसाच्या श्वासोच्छ्वासात मात्र तीव्र भावना सतत धडधडत असतात.

आणि त्या दिवशी जाणवलं शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये ही गोष्ट खरी असेल कदाचित, पण जर एकदा ती पायरी चढावी लागली तर न्यायालय हे फक्त कायद्याचं नव्हे तर मानवी नाट्याचाही रंगमंच आहे.




# श्रीयश फार्मसीत जागतिक फार्मसी दिन उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च तसेच श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत बी.फार्मसी आणि डी.फार्मसीचे विद्यार्थी यांनी उत्साहात जागतिक फार्मसी दिन साजरा केला. यावर्षीची संकल्पना ''थिंक हेल्थ, थिंक फार्मसी'' अशी होती.

या निमित्त विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीविषयी प्रभावी जनजागृती मोहिम राबवली. त्यांनी सादर केलेल्या लघुनाटिकेतून समाजाला व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्टपणे मांडले. लघुनाटिकेतील प्रभावी संवाद आणि विद्यार्थ्यांची उत्कृष्ट अभिनयशैली यामुळे प्रेक्षकांना मोठ्या प्रमाणात जागृती मिळाली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी रील स्पर्धा आयोजित केली, ज्यात त्यांनी लहान-लहान व्हिडिओ तयार करून दैनंदिन जीवनात फार्मासिस्टचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. रील्सच्या माध्यमातून लोकांना औषधोपचारांबाबत योग्य मार्गदर्शन, औषधांचा योग्य वापर आणि फार्मासिस्टच्या सामाजिक जबाबदाऱ्यांवरही प्रकाश टाकण्यात आला.

याशिवाय स्ट्रीट शो आणि रॅली द्वारेही संपूर्ण जगासाठी फार्मासिस्टची भूमिका आणि महत्त्व अधोरेखित करण्यात आले. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी विद्यार्थ्यांच्या, प्राचार्य व अध्यापकांच्या प्रयत्नांचे मनःपूर्वक कौतुक केले.

# वेल डन आई चित्रपटाचा धम्माल टीझर प्रदर्शित

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या मॉडर्न युगातील आईची गोष्ट सांगणारा वेल डन आई हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे. आई ही आई असते, मग ती पूर्वीच्या काळातील असो वा, आजच्या काळातील... आई आपल्या मुलांसाठी काहीही करू शकते, कोणत्याही थराला जाऊ शकते, कोणतीही गोष्ट सहन करू शकते. मुलाला ठेच जरी लागली, तरी आईच्या डोळ्यांतून पाणी येते. अशाच आधुनिक युगातील आईची धमाल गोष्ट वेल डन आई या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. ३१ ऑक्टोबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. नुकताच या चित्रपटाचा धडाकेबाज टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे.

निर्माते सुधीर पाटील यांनी दीपाली प्रोडक्शन या बॅनरअंतर्गत वेल डन आई चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन शंकर अर्चना बापू धुलगुडे यांनी केले आहे. कथा, पटकथा आणि संवादलेखन संदीप गचांडे व शंकर धुलगुडे यांनी केले आहे. वेल डन आईच्या टीझरने प्रदर्शित झाल्यापासून सोशल मीडियावर प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या चित्रपटातील आईचा काहीतरी प्लॅन असल्याचे




टीझरमध्ये पाहायला मिळते. टिझरच्या सुरुवातीलाच आई म्हणते की, मी जो प्लॅन सांगितलेला आहे तसेच सर्वांनी करायचे. जे सांगितलेले नाही ते करायचे नाही. आईच्या म्हणण्यानुसार सर्वजण तयार होतात, पण आईचा नेमका प्लॅन काय आहे? हे मात्र टीझरमध्ये समजत नाही. या प्लॅनचा उलगडा प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच होईल. आईचा आत्मविश्वास बघून मुलाचाही आत्मविश्वास दुणावतो आणि तो म्हणतो की, यंदा माझं लग्न नक्की होणार... मुलाच्या वडीलांचं एक वेगळंच कॅरेक्टर आहे. वेल डन आईचा टीझर खऱ्या अर्थाने उत्साहवर्धक असून, चित्रपटाबाबतची उत्सुकता वाढवणारा आहे. या चित्रपटात खूप धमाल आणि मस्तीही असणार याची जाणीवही टीझर पाहिल्यावर होते.

महाराष्ट्राच्या घरोघरी लोकप्रिय असलेल्या कॉमेडी क्वीन विशाखा सुभेदारने वेल डन आईमध्ये शीर्षक भूमिका साकारली आहे. याखेरीज विजय निकम, जयवंत वाडकर, आयुष पाटील, सिमरन खेडकर, बीना सिद्धार्थ, तन्वी धुरी, विपुल खंडाळे आदी कलाकार महत्वपूर्ण भूमिकांमध्ये आहेत. सिनेपोलीस या चित्रपटाचे वितरण करणार आहे. गीतकार संदीप गचांडे यांनी या चित्रपटासाठी गीतलेखन केले असून, संगीतकार निशाद गोलांबरे यांनी संगीत दिले आहे. ॲग्नेल रोमन यांनी पार्श्वसंगीत, तर देवेंद्र तावडे यांनी कलादिग्दर्शन केले आहे. रंजीत साहू यांनी छायांकन केले असून निलेश गावंड यांनी संकलन केले आहे. नृत्य दिग्दर्शन चिनी चेतन यांनी केले असून, केशभूषा मयुरी बस्तावडेकर यांनी केली आहे. प्रतिभा गायकवाड यांनी वेशभूषा केली असून, माधव म्हापणकर यांची रंगभूषा आहे. मानस रेडकर या चित्रपटाचे सहदिग्दर्शक असून, राज्यपाल सिंह यांनी कार्यकारी निर्मात्याची भूमिका चोख बजावली आहे. काफिल अन्सारी यांनी प्रोडक्शन हेड म्हणून काम पाहिले आहे.

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ

सिडको परिसरात लवकरच शुभारंभ....
एक छान लोकेशन जिथे आपण --
▪ बर्थडे पार्टी ▪ रिसेप्शन ▪ किटी पार्टी
▪ कॉन्फरन्स मिटिंग ▪ गेट - टू - गेदर
▪ सांस्कृतिक कार्यक्रम ▪ प्रकाशन समारंभ
▪ डोहाळ जेवण ▪ भिशी पार्टी व इतर...
हे व असे बरेचसे कार्यक्रम करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. एसी हॉल, लॉन, गार्डन, केटरिंग व्यवस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, साउंड सिस्टीम सर्व व्यवस्था एकाच ठिकाणी
विशेष : - प्रसन्न वातावरण - सुलभ पार्किंग व्यवस्था - सौजन्य सेवा - मध्यवर्ती ठिकाण - अगदी किफायतशीर दरात
सिद्धिविनायक
▪ हॉटेल ▪ लॉन ▪ इव्हेंट
संपर्क : 7498560019, 7588803314
Email phulambrikarrajendra@gmail. com



ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

## दवाखाना

# कुष्ठरोग – भाग ३

**ज्योतिर्मय साहित्य**


नमस्कार मैत्रांनो!

'कुष्ठ' हा शब्द संस्कृतमध्ये त्वचेच्या रोगांसाठी वापरला जातो. यांत खपल्या किंवा व्रण येणे, त्वचा फाटणे किंवा त्वचेत विकृती निर्माण होणे अशा गोष्टींचा समावेश होतो. मात्र इथे आपण एका विशिष्ट जिवाणूजन्य रोगाची चर्चा करतोय.


**कुष्ठरोगाचे प्रकार**

कुष्ठरोगाचे मुख्यत्वेकरून २ प्रकार आहेत. हे प्रकार रोग्याची लक्षणे, सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे दिसणारी मायकोबॅक्टेरियम लेप्रे या जिवाणूंची संख्या आणि रोग्याची या जिवाणूंविरूद्ध प्रतिकारशक्ती यांवर आधारित आहेत.

१. पॉसिबॅसिलरी (अल्पजिवाणूजन्य) कुष्ठरोग / सौम्य कुष्ठरोग: याचे देखील उपप्रकार आहेत, पण सर्वात अधिक आढळणारा उपप्रकार म्हणजे ट्युबरक्युलॉइड कुष्ठरोग. यात प्रभावित भागाची सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे तपासणी केल्यावर संबंधित जिवाणूंची संख्या अतिशय कमी आढळते आणि रोग्याच्या चांगल्या प्रतिकारशक्तीमुळे टीबीप्रमाणेच त्या भागांत ग्रॅनुलोमा (कणीदार ट्युमर) आढळून येतात. जिवाणूंचा हल्ला जिथे होतो तिथे रोग्याची प्रतिकारशक्ती त्यांना अटकाव करते. अशाने रोग त्या भागांतच सीमित राहतो. या प्रकारात रुग्णाच्या त्वचेवर पाच किंवा त्यापेक्षा कमी ठिपके असतात. त्यांत त्वचेचा रंग बदललेला असतो त्या ठिकाणी स्पर्श केल्यावर संवेदना कमी वाटतात. चेहरा आणि हात पायाच्या चेता (नव्हर्ज) आकाराने मोठ्या होतात. जाड झालेल्या चेता आणि स्नायू दौर्बल्य ही लक्षणे दिसून येतात. यामुळे कधी कधी रोग्याला खाली टाकलेले पाऊल वर उचलता येत नाही तसेच चालण्यात दोष उत्पन्न होऊ शकतो. प्रशिक्षित डॉक्टर हे तपासणीत लगेच ओळखतात. समाजासाठी समाधानाची बाब ही की जवळपास ७० % रोगी या प्रकारातील असतात आणि संबंधित जिवाणूंची संख्या अत्यल्प असल्याने या रोग्यापासून इतरांना संसर्गाची भीती नसते. मात्र कुष्ठरोग्यांविषयी सकारात्मक सामाजिक जाणीवा अत्यल्प असल्याने हे समाधान महत्वाचे नाही मंडळी!




२. मल्टीबॅसिलरी (बहुजिवाणूजन्य) कृष्ठरोग / गंभीर कुष्ठरोग: याचे देखील उपप्रकार आहेत. पण सर्वात अधिक आढळणारा उपप्रकार म्हणजे लेप्रोमॅटस कुष्ठरोग. बहुतांशी रुग्णांच्या त्वचेवर खूप चट्टे (पांचहून अधिक) असतात. अनेकदा हे ठिपके सुजलेले आणि लालसर दिसतात. यासोबतच स्नायू आणि परिधीय नसा देखील गंभीररित्या बाधित होऊन कमीअधिक प्रमाणात अकार्यक्षम होतात. रोगाने प्रभावित उतींची सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे तपासणी केल्यावर संबंधित जिवाणूंची संख्या हजारोंनी किंवा अधिक आढळते. हा प्रकार अत्यल्प प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तीत दिसतो. त्यामुळे रोगापासून बचाव करण्यास प्रतिकार यंत्रणा अपुरी पडते आणि कुष्ठरोगाच्या एरवी मंदगती असलेल्या जिवाणूंना ऊत येऊन ते चांगल्याच जोमाने वाढतात. समाजासाठी हा प्रकार घातक अशासाठी असतो की हा संसर्गजन्य आहे. ही समस्या आणखी चिंताजनक आहे कारण लहान मुलांना याची लागण लवकर होते.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

या रोगात चेहऱ्यासकट शरीरभर विशिष्ट प्रकारच्या गाठी येतात. कधीकधी त्या डोळे, नाक आणि घशामधील अंतर्त्वचेवर देखील दिसून येतात. चेहऱ्यावरील गाठींमुळे रोग्याचा चेहरा सिंहासारखा दिसायला लागतो. मंडळी, हा बहुजिवाणूजन्य कुष्ठरोगाचा खराखुरा विदारक चेहरा बघूनच सर्वसामान्यांना या भीषण रोगाचे भय वाटते. गंभीर रुग्णांत अंधत्व, आवाजात बदल, तसेच नाकाचा आकार बदलणे ही लक्षणे आढळतात.

कुष्ठरोगाचा उष्मायन कालावधी (संसर्ग झाल्यापासून तर प्रत्यक्ष रोगाची लक्षणे दिसेपर्यंत) सामान्यतः अतिशय दीर्घ आणि परिवर्तनशील आहे (कांही महिने ते २० वर्षे). हा काळ सरासरी १० वर्षे असावा असे एकूण मत आहे. याचे कारण अर्थातच कुष्ठरोग जिवाणूंची मंदपणे होणारी वाढ!

कुष्ठरोगाचे निदान

कुष्ठरोगाचे जिवाणू हे असिड फास्ट प्रकारचे आहेत. त्वचेची बायोप्सी, नाकातील किंवा उतींच्या स्त्रावामध्ये विशिष्ट प्रकारच्या रंजक काचपट्टीच्या (झीहल-नीलसन डाग) सूक्ष्मदर्शक चाचणीमध्ये ते दिसतात. बहुजिवाणूजन्य कृष्ठरोगात हे जिवाणू त्यांच्या अधिक संख्येमुळे सहजपणे ओळखता येतात, मात्र अल्पजिवाणूजन्य प्रकारात ते अभावानेच दिसत असल्याने या प्रकाराचे निदान मुख्यत्वे करून वैद्यकीय लक्षणावरूनच करावे लागते. या व्यतिरिक्त रोगाचा इतिहास जाणून घेतांना रुग्णाचा कुष्ठरोग-प्रवण भागात असलेला रहिवास आणि संसर्गजन्य रुग्णाची सोबत हे देखील रोगाची खात्री करायला महत्वाचे आहेत.

पुढील भागात याविषयी अधिक चर्चा करू या.



**या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**



# जेवलीस कां ग?

ज्योतिर्मय 📖 साहित्य

सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते।।....

(भावार्थ हे नारायणी, तू सर्व प्रकारे मंगल प्रदान करणारी मंगलमयी आहेस, कल्याणदायिनी शिवा आहेस, सर्व मानवांना परिपूर्णता देणारी, शरणागतवत्सला, त्रिनेत्री, तेजस्वी वर्णाची गौरी आहेस. हे दुर्गामाते, तुझ्या श्रीचरणी नमस्कार आहे!)

नमस्कार मैत्रांनो!

नवरात्रोत्सवाच्या मंगलमय शुभेच्छा!

हा परमपवित्र उत्सव आपण मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करीत आहोत. श्रीदुर्गामातेचा गजर आसमंतात घुमतो आहे. भारताच्या प्रत्येक प्रांतात विविधप्रकारे देवीची ही आराधना सुरु आहे. आपण देवीकडे प्रार्थना करतांना स्वतःकरिता कांहीतरी मागतच असतो. मात्र संत ज्ञानेश्वर ''दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो, जो जें वांछील तो तें लाहो, प्राणिजात''. असे सकळ विश्वासाठी पसायदान मागतात. विश्वाचे असू द्या, आता आपल्या गृहलक्ष्मीसाठी देवीला साकडे घालण्यासाठी आपण सज्ज व्हायला हवे, कारण कुटुंबाच्या कल्याणासाठी ती आपले समस्त आयुष्य पणाला लावीत असते. महाकवी कालिदासांनी आपल्या 'रघुवंशम्' या प्रसिद्ध संस्कृत महाकाव्यात स्त्रीच्या विविध रूपांचे विलोभनीय वर्णन केले आहे. रघुवंशकुलोत्पन्न अयोध्येचा राजा अज (दशरथाचा पिता) इंदुमती या आपल्या प्राणप्रिय पत्नीच्या निधनानंतर शोकसंतप्त होत विलाप करीत म्हणतो,

''गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां बत किं न



मे हृतम'' ।।

(रघुवंशम् -अष्टम सर्ग - ।। ६७ ।।)

(भावार्थ - ''हे वल्लभे, तूच माझी गृहलक्ष्मी, मंत्री, सचिव, एकांतात अनन्य हृदयस्थ सखी आणि संगीत-नृत्यादि मनोरम कलांच्या प्रयोगात माझी प्रिय शिष्या होतीस. म्हणूनच सांग (समष्टीरूपाने / एकंदरीत) तुझे हरण करणाऱ्या क्रूर काळाने माझे सर्वस्व हरले नाही कां?)

या श्लोकानुसार एकाच स्त्रीच्या किती भूमिका असतात हे ध्यानात येते. तिला मखरात बसवण्यात भारतीय संस्कृतीचा खूप मोठा हातभार आहे. या पार्श्वभूमीवर एक वाक्य आठवले. मध्यंतरी मुलीशी मैत्री वाढवण्याकरता मुलांमध्ये एका संवादाची आवर्तने होत होती, जेवलीस का? हा 'डेंजर ट्रेंड' असल्याचे ध्यानात आल्यावर मुंबई पोलिसांनी अशा भविष्यकालीन रोमियोंसाठी एक प्रसिद्ध टिवटिव केली होती, ती जेवेल रे तिच्या घरी, काळजी करू नकोस !

आपल्या पतीला, मुलांना आणि अन्य कुटुंबियांना संबंधित स्त्री सतत विचारत असते जेवलास कां? घरातील अन्य सदस्य तिला हा प्रश्न विचारण्याच्या फंदात बहुदा पडत नाहीत. कारण त्यांनी हे गृहीत धरलेलेच असते. कित्येक घरांमध्ये कर्त्या पुरुषाला अन मुलांना निवडून सकस अन्न द्यायचा परिपाठ आहे.

डॉक्टर मीना श्रीवास्तव
मोबाईल नंबर- ९९२०१६७२११

परंतु मुलींना तेच अन्न दिल्या जाईल याची शाश्वती नाही. पुरुषजातीला अधिक अंगमेहनत पडते, म्हणून ही तथाकथित कल्याणकारी योजना! गर्भारपण, मासिकपाळी नामक नैसर्गिक प्रक्रियांमध्ये स्त्रियांच्या रक्तातील लोह तत्व कमी होऊन त्यांना रक्तक्षय होत असतो. याखेरीज अनियमित निकृष्ट आहार अन नियमित उपवासामुळे हा आजार वृद्धिंगत होत असतो. या बाबतीत स्त्रीचे शैक्षणिक, आर्थिक अन सामाजिक स्थान कुठलेही असो, तिला या सार्वत्रिक समस्येने ग्रासलेले असते असे खेदाने म्हणावे लागेल.

भारतीय महिलांमध्ये अशक्तपणाचे प्रमाण (बहुतेकदा लोह तत्वाच्या कमतरतेमुळे) जास्त आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणातील अलीकडील आकडेवारीनुसार गर्भवती असलेल्या आणि नसलेल्या जवळपास ५५ % महिलांना (१५-१९ वर्षे) याने ग्रस्त होत्या. सुमारे ५९% किशोरवयीन मुली देखील रक्तक्षयाने बाधित असल्याचे आढळून आले. मंडळी, ही आकडेवारी अत्यंत चिंताजनक आहे. याशिवाय सुमारे ७०% भारतीय महिला कॅल्शियमचे अपुऱ्या मात्रेत सेवन करतात. त्यामुळे ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिलांमध्ये (अंदाजे ३०%) ऑस्टिओपोरोसिस अर्थात हाडे ठिसूळ होणे हा एक महत्त्वाचा सार्वजनिक आरोग्य प्रश्न आहे.

वयाच्या प्रत्येक उंबरठ्यावर वेगवेगळ्या नात्यांचे अलवार पदर अलगदपणे उलगडणाऱ्या स्वतःच्या आयुष्यातील सर्व पातळ्यांवर लढण्याची सक्षमता दाखवतांनाच स्वतःकडे दुर्लक्ष करणे हा भारतीयच नव्हे तर अखिल स्त्रीजातीचा स्थायीभाव असावा. त्यागाची मूर्ती म्हणवून घेण्यात धन्यता मानणाऱ्या स्त्रीला इतरांकडून प्रोत्साहन मिळाले तर यात 'दोष हा कुणाचा'?

सर्व वयाच्या स्त्रियांना ही नम्र विनंती की कोणी जेवलीस का? असे म्हणो अथवा न म्हणो, आपण आपल्या रोजच्या सकस, संतुलित अन नियमित आहाराचे महत्व ध्यानी घ्यावे! पुरुष मंडळी कधीही घरी येवोत, आपण झोपायच्या आधी किमान दोन तास आधी आपली रात्री जेवायची वेळ कां चुकवायची? या शुभारंभासाठी दसऱ्याचा सुरेख सुमुहूर्त साधावा! तुम्हाला काय वाटतं?

## आजची माळ - वाईटांचा त्याग



ज्योतिर्मय 📖 साहित्य

नमस्कार

आज अश्विन शुद्ध सप्तमी २८/९/२०२५

वार-रविवार

मातेची आजची पूजा विश्वव्यापी रूपात केली जाते. जळी, स्थळी काष्ठी, पाषाणी या सर्वात मातेचा वावर आहे म्हणून विश्वव्यापक जननी

असे म्हणले आहे. वाईटांचा त्याग करा व सन्मार्गाची कास धरा हा तर हिंददूस्थानी संस्कृतीचा गाभा आहे. त्यासाठी तर गणेशोत्सव, नवरात्र, दसरा दिवाळी। सारखे सण आपण साजरे करतो.

आज आपण शारदा या विद्येच्या रूपात असलेल्या जगदानंददायिनी मातेची शब्दरूपी पूजा बांधणार आहोत.

मला खात्री आहे बालकाचे बोबडे बोल माता न जाणी हीनपण म्हणजे जर काही चुकलं तर माता नक्कीच क्षमा करेल.अशी आशा करून आजचा शारदोत्सव साजरा करूया.

सौ.ऊज्वला धर्माधिकारी
पुणे

वेदांची जननी, ब्रम्हदेवाची कन्या, नारदाचे जन्मस्थान, आणि असुर प्रवृतीशी लढणारी, दुष्टांचे निर्दलन करणारी अशी शारदा होय. खरं पहायला गेलं तर सरस्वती शारदेचे स्वरूप हे

परमात्मस्वरूप कल्पनेच्या पलिकडे आहे. शब्द तेथे पोहचू शकत नाहीत त्याला मानवी कल्पनेच्या कक्षेमध्ये आणून परमात्मा असे नाव देणारी उपमेच्या पलीकडे असणाऱ्या पण उपमेच्या प्रातांत आणणारी ही शारदा आहे.

देवी शारदा ही कवी लेखक मंडळींना स्फूर्ती देणारी देवता आहे. ती जशी ''विश्वव्यापी आहे. तशी ती योग्याच्या समाधीमध्ये आहे. वीर धाडसी पुरूषाच्या निर्भतेमध्ये

शारदा आढळते. अनेक भव्यदिव्य घटना घडण्यामागे शारदेचाच आशिर्वाद असतो. शारदा अनेक विश्व निर्माण करते. तिच्या हातात शस्त्र आहेत. प्रसंग पाहून ती शत्रुचा पराभव करते .

शत्रुला त्राहीमाम करून सोडते हे एक महत्त्वाचे रूप पहायला मिळते.

विश्वातील सौदर्याची ती सुंदर स्वामिनी पण आहे. सुर्याच्या तेजात एकरूप होणारी आहे. मोक्षाचे वैभव देणारी व मंगलात मंगल करणारी जीवनकला आहे. साधकाला आत्मचिंतनाची कला शिकवणारी आणि सिध्दांच्या अंत:करणात समाधिरूपाने स्थिर होणारी शारदाच आहे. ती जशी देवधर्म परायण आहे तशी वेदमाता, ब्रम्हसुता, प्रसंगी कठोर होणारी महामाया आहे तशीच वाग्देवता पण आहे.

शारदा म्हणजे ईश्वराची निवांत निर्मळ आणि निश्चल अवस्था आहे.

माणसाच्या मनातील विचार शब्दांचे माध्यम घेऊन प्रगट होते हे शारदे मुळेच शक्य झाले आहे.

आज आपण आधुनिकीकरण झालेल्या युगात नवनवीन तंत्रज्ञान विकसित झालेल्या स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून ''शारदोत्सव''साजरा करत आहोत. त्यात आपण आपल्या संस्कृतीचा वारसा जपणे जोपासणे, आणि वाढवणे ही आपली जबाबदारी आहे याचा विसर पडू देऊ नये.

तर मित्रांनो आपण या निमित्ताने संस्कृती व समाजमन यांना वैचारिक पातळीवर एकत्र आणण्यासाठी

जाणीवपूर्वक प्रयत्न करूया. आपल्या दैनंदिन व्यवहारात, जगण्यात जो उथळपणा, भंपकता, समोरच्याला सतत कमी समजणे व मी कसा मोठा आहे असे स्वयंघोषित मोठेपणाचा आवेशात असणे, यावर सर्व समाजाने परिवर्तनाचा वारसा जपला पाहिजे. वैचारिक बैठक, तारतम्य, एकमेकांना आदर देणे, विनाकारण वाचाळता यावर नियंत्रण राखलं गेलं पाहिजे.

तुम्ही दररोज रांगा लावून देवीचं दर्शन घेता, रासगर्भा खेळा,दांडिया खेळा,महिला वर्गाने सोळा श्रुंगार करा रोज नवनव्या साड्या नेसा भरपूर दागिने घालून आपली हौस भागवा तुम्हाला कुणीही मनाई केली नाही ही आपली संस्कृती आहे.


पण कर्तव्याला विसरू नका.परस्पर सामंजस्य,बंधुभाव एकता मनामनात असलेली कटुता संपवणे ती नष्ट करणे. हा संदेश सतत ध्यानात ठेऊन समाजमन एकत्र करण्याचा संकल्प करूया हे देवीला शारदेला हवे आहे.

सहकुटूंब सहपरिवार।
दास आम्ही हे घरदार।तव पदी अर्पु असार।
संसाराहित हा भार। अशा या बंधरूपायै
शारदेला माझा वारंवार नमस्कार असो.

नवरात्र

आदिशक्ती आदिमाया
सृजनाचे वरदान
सृष्टीची पालनकर्ती
राक्षसांचे संहारण
तू भवानी जगदंबा
स्त्रीचे मनी तुझे स्थान
तू काली तूच चंडीका
उमा गौरी तू महान
नवदुर्गेच्या रूपात
नवरात्रात पुजती
अंबामातेचा गोंधळ
भक्त गरबा खेळती
उपवासाचे महत्व
घट मांडूनी पूजन
अष्टमीला असे होम
भक्तीशक्तीचे पूजन
सिमोल्लंघन दसरा
दशानंदाचे दहन
आपट्याची पाने सोनं
नमस्काराचा सन्मान .....

.. सुनिल माथने,
अकोला-



## जागर आदिशक्तीचा



सखी महिला मंडळ टीव्ही सेंटर, हडको, छत्रपती संभाजीनगर यांनी नवरात्र निमित्ताने जागर आदिशक्तीचा या अंतर्गत महिला मंडळाने दुर्गा सप्तशतीचे पाठ केलेत. या कार्यक्रमाची सांगता दुर्गादेवीच्या पाच आरत्यांनी करण्यात आली व यावेळेस उपस्थित महिलांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. यामध्ये अर्चना शिंपी, मेघना बोरकर, कल्पना कहाटे, सपना सोमाणी, मंजुषा सोनवणे, प्रतीक्षा दातरंगे, संगीता नाईक, मीनाक्षी टेहेरे, पुजा टेहेरे, राणी पाटील, प्रिया पाटील, सुधा माने, माधुरी राहुरकर, निशा मुळे, कमल बाविस्कर, गिता राजपुत या आजच्या नवदुर्गानी भाग घेतला.



ll जय शारदे वागेश्वरी l
विधीकन्यके विद्याधरी

वीणे वरी पडता तुझी l
चतुरा कलामय अंगुली
संगीत जन्मा ये नवे l
जडता मतीची भंगली
उन्मेष कल्पतरु वरी l
बहरून आल्या मंजिरी
जय शारदे वागीश्वरी ll

ज्योत्स्ने परी कांती
तुझी
मुख रम्य शारद चंद्रमा
उजळे तुझ्या हास्यातुनी
दाही दिशांची पौर्णिमा
तुझिया कृपेचे चांदणे
नित वर्षु दे,आमुच्या
शिरी
जय शारदे वागीश्वरी ll

..शांता शेळके.

● आई अंबे ●
-----------------------------------
आई अंबे जय जगदंबे
दर्शनाला तुझ्याच आलो
दर्शनाने तुझिया माते
त्रिलोकी पावन झालो ।।धृ।।
अनेक रूपे तुझीच माते
विश्ववैभवी महालक्ष्मी तू
माहुरनिवासी रेणुकामाता
तुळजाई योगेश्वरी तू
तुझ्याच मंगलमयी कृपेत आम्ही न्हालो...
आई अंबे जय जगदंबे ।।१।।
श्रीशांता दुर्गा मंगेशी तू
सप्तशृंगीगड निवासी तू
विश्वजननी वैष्णवी माता
शक्ती भक्तीची महागाथा तू
तुझिया चरणी माते आम्ही उद्धरलो....
आई अंबे जय जगदंबे ।।२।।
महिषासुर मर्दिनी माता
तू आसुरांचा केला नाश
महाकाली तू एकवीरा तू
तुझीच रूपे आमुचा श्वास
जन्मो जन्मी तुझिया सेवेत
आम्ही भक्त रमलो...
आई अंबे जय जगदंबे ।।३।।
आदिशक्ती तू महामती तू
सरस्वती तू तूच लक्ष्मी
शत्रू नाशिनी सुख दायिनी
नव नित्य गावू तुझीच आरती
तुझिया भाव भक्तीने पावन आम्ही झालो...
आई अंबे जय जगदंबे ।।४।।



©कवी विवेक द. जोशी
9850433178

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559